# बापुजी सांळुखे यांचे शिक्षण चळवळीतील योगदान

**प्रा.दयानंद बजरंग इनामदार**

**राज्यशास्त्र विभाग, श्रीपतराव चौगुले आर्ट्स अँड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली**

**प्रस्तावना :**

महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे, महर्षी आण्णासाहेब कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, कर्मवीर घोगरे, कर्मवीर मामासाहेब जगदाळे, गुरूवर्य बाबूराव जगताप या शिक्षण प्रसारकांच्या मालिकेतील एक रत्न म्हणजे शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शिक्षण प्रसाराचे कार्य केले. बापूजींनी सामान्य जनतेच्या शिक्षणाची गैरसोय त्यांच्या लक्षात घेऊन रयत शिक्षण संस्थेत नोकरी करीत असताना नवीन शिक्षण संस्था स्थापन करण्याचा विचार त्याच्या मनात निश्चित केला होता. या विचारातूनच १९५४ मध्ये बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेची स्थापना केली. या संस्थेमार्फत त्यांनी महाराष्ट्रातील ११ जिल्ह्यात विशेषत: ग्रामीण भागात ठिकठिकाणी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये. शिक्षक प्रशिक्षण विद्यालये व महाविद्यालये काढून शिक्षण प्रसाराचे कार्य केले गेले. याच्या माध्यमातून त्यांनी समाजातील गरीब व्यक्तिंना शैक्षणिक प्रवाहात आणण्याचे ध्येय त्यांनी केले. त्यांनी स्थापन केलेल्या शिक्षण संस्था या ज्या ठिकाणी शिक्षणाची सोय नाही तेथे त्यांनी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली व बहुजन समाजाला शिक्षणाच्या प्रवाह सामील करून घेतले गेले. या त्यांच्या शैक्षणिक कार्यांच्या आढावा घेतला.

उद्दिष्टे :

१) शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

४) शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी स्थापन केलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात दिलेले योगदान अभ्यासने

शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे व शिक्षण चळवळीतील :

शिक्षणातून मानवी मूल्यावर विश्वास असणारे साक्षर निर्माण व्हावेत. अहिंसा, अत्याचार, अन्याय, क्रोध व संहार करणारे राक्षस निर्माण होऊ नयेत, यासाठीच शिक्षण प्रसार कार्याची गरज असते, तसेच माणसाने माणसाशी माणसाप्रमाणे वागावे यासाठी शिक्षणाची आवश्यकता असते. निकोप लोकशाहीच्या सर्वांगीण प्रगतीसाठी दारिद्रय निर्मूलन आणि साक्षरता हे अतिशय भक्कम आधार असतात. साक्षर लोकशक्ती हा लोकशाहीचा भक्कम आधार असतो. एकविसाव्या शतकाच्या आरंभी जगातील निरक्षरांची संख्या शंभर कोटोच्या जवळपास जाण्याची भीती शिक्षणतज्ज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ व्यक्त करीत आहेत. शिक्षणामुळे कोणत्याही क्षेत्रातील उत्पादनात व त्याच्या कार्यक्षमतेत वाढ दिसून येते. देशाची प्रगती झपाट्याने होण्यासाठी शिक्षण प्रसार महत्वाचा आहे, तसेच विकासाची गती अवरोधित करणारी परंपरागत चुकीच्या कल्पनांचे जोखंड शिक्षणाद्वारे झुगारून देण्यास मदत होईल. यादृष्टीने समाजाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्व असल्याने याचे महत्व ओळखून त्यांनी शिक्षण महर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांनी ☒लामपुरात नागनाथ नायकवडी, बाबूराव कोकाटे, एस. पी. पाटील, जी. ए. लाड, सखाराम मगदूम, विनायक थोरात, यांच्या सहकार्याने श्रीराम समाजसेवा मंडळाची स्थापना केली. या मंडळाच्या माध्यमातून त्यानी प्राथमिक शिक्षणासंबंधी कार्याकडे लक्ष दिले. प्राथमिक शिक्षण हा स्माजाच्याचा मुलभूत कणा असल्याने त्याचा विकास करणे आवश्यक आहे. अशा विचारातूनच कोल्हापूर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल सुरू केले. स्वातंत्र्यानंतर ६ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांची प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने घेतल्यामुळे सर्व प्राथमिक शाळा शासनामार्फत चालू होत्या. परंतु

काही वर्षानंतर खाजगी शैक्षणिक संस्थांना विनाअनुदान तत्त्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास परवानगी दिल्यावर स्वामी विवेकानंद संस्थेने सन १९८७ पर्यंत ४ प्राथमिक शाळा सुरु केल्या.

बापुजी साळंखे यांनीप्राथमिक शिक्षणा नंतर माध्यमिक शिक्षणाचा प्रसार केला. कारण माध्यमिक शिक्षण हा प्राथमिक शिक्षण व उच्चशिक्षण यांना जोडणारा दुवा आहे. तसेच यात माध्यमिक शिक्षणाने राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण होणे आवश्यक असल्याने त्यांनी माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यापासून विविध व्यवसायाच्या अनेक शाखा निर्माण करण्याचा निश्चय केला. त्यासाठी त्यांनी श्री स्वामी विवेकानंद संस्थेची घटना तयार करून माध्यमिक शिक्षणास प्रारंभ केला. सुरुवातीस त्यांनी पाच माध्यमिक विद्यालये सुरू केली. हि महाविद्यालय कोल्हापूर, सांगली, सातारा येथे स्थापन केले. अशा प्रकारे त्यांनी ग्रामीण भागात, दऱ्याखोऱ्यात, आदिवासो समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार व प्रचार केला आणि अल्पावधीतच माध्यमिक शिक्षणाचा विस्तार घडवून आणलेला दिसतो. बापुजींनी ग्रामीण भागात माध्यमिक शाळांची मोठ्या प्रमाणात स्थापना केलेलो दिसून येते.

बापुजींनी पाटण तालुक्यात चाफळ येथे श्री समर्थ विद्यामंदिर,तारळे येथे छत्रपती विद्यामंदिर , कराडजवळील उंडाळे या गावीदेखील बापूजींनी तेथील प्रतिष्ठित ग्रामस्थ बाळकृष्ण पाटील व दिनकर पाटील यांच्या मदतीने माध्यमिक विद्यालय सुरू केले. वाई येथे महर्षी शिंदे विद्यामंदिर सांगली जिल्ह्यात मणेराजुरी येथे महावीर पांडुरंग साळुंखे या नावाने माध्यमिक विद्यालय सुरू केले. सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यात मांगर्डे येथे सन १९५७ मध्ये वसंतराव पाटील विद्यामंदिर नावाने हायस्कूल सुरू केले. सन १९५८ मध्ये बापूजींनी तळमावळे येथील श्री. काकासाहेब चव्हाण यांच्या सहकार्याने वाल्मिकी विद्यालयाची स्थापना केली. सन १९५९ मध्ये गडहिंग्लज हायस्कूल व सातवे हायस्कूल अशी आणखी दोन विद्यालये कोल्हापूर जिल्हयात काढली आणि रत्नागिरी येथे शिवाजी हायस्कूल सुरू केलेली दिसून येते. अशा पद्धतीने माध्यमिक विद्यालययांचा विस्तार केलेला दिसतो. १९५५ ला ५ माध्यमिक महाविद्यालय सुरु केले असून २००० मध्ये १७५ माध्यमिक विद्यालय सुरु झालेली दिसतात.

माध्यमिक शिक्षणानंतर उच्च माध्यमिक शिक्षण प्रसार कार्य बापुजींनी सुरु केले. त्यांनी माध्यमिक विद्यालयांना संलग्न अशा उच्च माध्यमिक वर्गाची सुरुवात सन १९७६ पासून केली. पहिली दोन वर्षे ही उच्च माध्यमिक विद्यालये विनाअनुदान तत्त्वावर असल्याने बापूजींनी माध्यमिक विद्यालयातील अनुभवी शिक्षकांकडून ११ बी १२ वीचे वर्ग चालविले. माध्यमिक विद्याल्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा या उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना निर्माण करून दिल्या. बापूजींनी सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, रायगड या जिल्ह्यांतील माध्यमिक विद्यालयांना संलग्न असलेली एकंदर ६३ माध्यमिक विद्यालये स्थापन केली. याच बरोबर त्यांनी उच्चशिक्षण प्रसारासाठी केलेले प्रयत्न केले त्यात उच्चशिक्षणाचे महत्व व वाढती गरज पटवून देण्यासाठी बापूजींनी ठिकठिकाणी दौरे काढले.यातूनच त्यांनी २० महाविद्यालये काढली व त्यातून कला, वाणिज्य, शास्त्र या शाखांच्या पदवी अभ्यासाची व काही ठिकाणी पदव्युत्तर शिक्षणाची सोय केली. या महाविद्यालयाच्या विकासासाठी त्यानी देणग्या गोळा केल्या. विद्यार्थ्यांच्या श्रमदानाने काही महाविद्यालयाच्या ऻरतो बांधल्या. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळावे म्हणून आदर्श मेहनती, कार्यक्षम शिक्षक नेमले. तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेण्यास उत्तेजन दिले.

तंत्रशिक्षण हा राष्ट्रविकासातील महत्वाचा घटक असल्याने बापूजी साळुंखे यांचे पारंपारिक शिक्षणाप्रमाणेच तंत्रशिक्षण प्रसार कार्य केले. सन १९६१ मध्ये त्यांनी सासवड येथे पुरंदर टेक्निकल हायस्कूल सुरू केले. तसेच सन १९६२ मध्ये बापूजींनी पारगाव, तासगाव, लोणी काळभोर येथे तंत्र विद्यालये काढली. सन १९८४ मध्ये पाटण वेथे पॉलिटेक्निक सुरू केले. या प्रकारे बापूजींनी तंत्रशिक्षणाचे महत्व पटवून दिले, तसेच विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले. जास्तीत-जास्त फंडाची गुंतवणूक, कुशल प्रशिक्षित कर्मचारी, गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य, नोकरीसाठी सहकार्य केले.

बापूजींनी यांनी मुलींच्या शिक्षणासाठी गर्ल्स हायस्कूलची स्थापना केली. या हायस्कूलच्या माध्यमातून मुलींसाठी सर्व सोयी उपलब्ध करून दिली तसेच त्यांनी स्वतंत्र वसतिगृहाची स्थापना केली. या ठिकाणी मुलींच्या शिक्षणास उत्तेजन मिळावे म्हणून बापूजींनी गरीब मुलींना आर्थिक सहाय्य केले. बापूजींनी स्वामी विवेकानंद संस्थाच्या माध्यमातून १३ गर्ल्स विद्यालय व ३ महाविद्यालय स्थापन केले. बापूजींनी स्त्री शिक्षण प्रसारासाठी मुलींच्या शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी बापूजी ठिकठिकाणी हिंडले. त्यांनी स्वतंत्र माध्यमिक विद्यालये व महाविद्यालये काढली. गरीब, होतकरू मुलींना आर्थिक सहकार्य केले.

**सारांश :**

बापूजींनी महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार तळागाळा पर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी स्वामी विवेकानंद संस्थाच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. त्यांनी आपल्या विचारांचे मेहनती, त्यागी कार्यकर्ते निर्माण केले व त्यांच्याकडून शिक्षणाचा विकास घडविण्यासाठी प्रयत्न केले. तसेच गरीब व होतकरू विद्यार्थ्यासाठी "कमवा व शिका ' आणि पुस्तकपेढी, राष्ट्रीय सेवा यासारख्या योजना राबवून उच्चशिक्षण घेण्याची संधी निर्माण करून दिली. त्यांनी ग्रामीण भागात खेडोपाडी हिंडून जनसंपर्क वाढविला. तेथील ग्रामस्थांना माध्यमिक शिक्षणाचे महत्व पटवून दिले. गरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गैरसोय दूर करण्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृहे काढून निरनिराळ्या योजना राबवून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. विसाव्या शतकात अनेक शिक्षणप्रेमी समाजसुधारकांनी समाज परिवर्तनाचे शिक्षण हे माध्यम मानले आणि शिक्षण प्रसाराचे कार्य केले. स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय जीवनातील अनेक क्षेत्रात एक प्रकारची शिथिलता निर्माण होऊ लागल्याचे बापूजींना जाणवले, तसेच लोकांमध्ये त्याग, कष्ट करण्याची तयारी व समाजासाठी झिजण्याची वृत्ती कमी होऊ लागल्याचे वापूजींना वाटू लागले. सुखासीनता. स्वार्थी व भ्रष्टाचारी प्रवृत्ती वाढत आहेत, त्यावर सुसंस्कारी शिक्षणच मात करू शकेल. त्याचवरोवर वाढती लोकसंख्या व शिक्षणाचा वाढता ओघ ओळखून बदलत्या सामाजिक गरजांना अनुरूप अशा तत्वाची व त्याच्या आचरणाची आवश्यकतेसाठी शिक्षणात वदल घडवून आणण्याची गरज निमाण बनली आहे. शिक्षणात बदल घडवून आणण्यासाठी बापूजींनी 'ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार' यासाठी शिक्षण प्रसार. हे संस्थेचे ध्येय म्हणून स्वीकारले आणि शिक्षणाच्या माध्मातून विद्यार्थ्यांवर सुसंस्कार घडविण्यासाठी प्रयत्न केले.

**संदर्भसूची :**

१. बापट भा. गो. : शैक्षणिक प्रश्न आणि महाराष्ट्रातील शैक्षणिक विकास पुणे, व्हिनस प्रकाशन १९७३ .
२. भोसले एस. एस. : महाराष्ट्राचे शिक्षण प्रयोग आणि परंपरा कोल्हापूर, बापूजी साळुंखे शताब्दीपूर्ती समिती १९८१
३. पाटणे संभाजीराव : शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे सातारा, सुशील प्रकाशन १९८२
४. पाटणकरना. वि. : मवशिक्षण प्रवाह आणि प्रवृत्ती पुणे, ज्योती प्रकाशन, १९६१
५. पाटील लीला : आजचे शिक्षण आजच्या समस्या पुणे, श्री विद्या प्रकाशन १९७१